## महाराष्ट्र शासन

# नागरीकांची सनदेंतर्गत नागरीकांना पुरविल्या जाणा-या सेवा

## सन २०११

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग
# मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

( व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००१.)

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.
WWW.DVET.GOV.IN e-mail: : dk02_dvet @YAHOO.COM Fax-२२६७९२३७/२२६७७६२८
Phone No. २२६२०६०४/२९३.

नागरीकांची सनद

## विभागाची सर्व सामन्य उद्दिष्टे

व्यवसाय शिक्षणाचे महत्व ओळखून व्यवसाय शिक्षणाच्या विविध योजना राज्यात राबविणे, उच्च शिक्षणाकडे जाणा-या युवकांचा अनाठाई लोंढा व्यवसाय शिक्षणाकडे वळवून बेरोजगारीवर मात करणे व निरुपयोगी शिक्षणावर होणारा खर्च कमी करणे तसे राज्यातील महिला मागासवर्गीय समाज, अपंग या सर्वांना व्यवसाय शिक्षणाच्या समान संाी उपलब्ध करुन देणे राज्यातील उद्योग धंद्याना लागणारे कुशल मनुष्यबळ प्रशिक्षित करुन त्याचा सातत्याने पुरवठा करणे व प्रगत तंत्रज्ञानाला सामोरे जाण्यासाठी कामगारां अद्यावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे.

## संचालनालयाची कार्यपध्दती

व्यवसाय शिक्षणाच्या विविध योजना तालुका व जिल्हा स्तरावर राबविण्यांकरिता सचलनालयाकडे राज्य स्तरावर संचालक ( प्रशिक्षण ) यांचे कार्यालय असून संचालनालयाच्या स्तरावर विविध प्रशिक्षण योनांच्या धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यांत येतात तसेच तालुका तथा जिल्हा स्तरावर ज्या विविध योजना राबविण्यांत येतात त्यांचे पर्यवेक्षण आणि संनियंत्रण करण्यांकरिता प्रादेशिक स्तरावर सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची कार्यालये आहेत. जिल्हा स्तरावर या योजनांचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करण्यांकरिता जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची कार्यालये आहेत. संस्था स्तरावर या योजनांची अंमलबजावणी व पर्यवेक्षण संस्था प्रमुख करतात.

## पर्श्वभूमी

औद्योगिक प्रशिक्षण योजना भारत सरकारने १९५० साली सुरु केली व १९५६ साली राज्य शासनास अंमलबजावणीसाठी हस्तांतरित करण्यांत आली. औद्योगिक प्रशिक्षणाद्धारे कारखान्यांना लागणारे कुशल कारागीर तयार करण्यांत येतात. त्याचबरोबर स्वयंरोजगारासाठी आवश्यक कौशल्य निर्मिती करण्यांत येतात. एक अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या प्रमाणात आठ कुशल कारागीर करखान्यात कामाला लागतात. जे विद्यार्थी पदवी किंवा पदविका अभ्यासक्रमांत एकतर कमी गूण असल्यामुळे किंवा आर्थिक परिस्थिती कुमकुवत असल्यामुळे प्रवेश घेवू शकत नाहीत. असे विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेतात. सद्य:स्थितीत एका जागेसाठी सरासरी १० अर्ज प्राप्त होतात.

सध्याच्या मुक्त बाजारपेठ व जागतिकीकरणामुळे कुशल कारागीरांना मोठया प्रमाणात मागणी असून त्यांना मिळणा-य सरासरी वतनांतसुध्दा चंगलीच वाढ झालेली आहे. सद्य:स्थितीत राज्यात ११२ विविध व्यवसाय अभ्यासक्रम राबविले जातात. इ. ८ वी, १० वी व १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ६ महिने, ०१ वर्ष व ०२ वर्ष मुदतीचे अभ्यसक्रम राबविले जातात. या या योजनेतुन उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता औद्योगिक कारखान्यांत एक ते दोन वर्ष मुदतीचे प्रशिक्षण शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत दिले जाते.

शासनाने राज्यात मोठय प्रमाणांत होणारी गुंतवणूक लक्षात घेता, मागील तीन वर्षात सतत या योजनेसाठी वाढीव तरतूद केलेली आहे. त्यामुळे कुमकुवत गरीब विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाच्या अधिकच्या चांगल्या सोई उपलब्ध होत.

राज्यातील सर्व तलुक्यांत शासकीय संस्था सुरु करण्यांच्या धोरणानुसार १९९९ पर्यंत राज्यात ३२६ तालुक्यांत औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यांत आल्या होत्या. १९९९ नंतरच्या नविर्मित तालुक्यांत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची सेय उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्या तालुक्यातील मुलांना इतर तालुक्यांत प्रशिक्षण घेण्यांसाठी जावे लागत होते. त्यामुळे काही विद्यार्थी इतर तालुक्यांत जावून प्रशिक्षण घेत होते तर काही विद्यार्थी सोयी नसल्यामुळे प्रशिक्षणापासून वंचित राहत होते. ही बाब लक्षात घेता शासनाने सर्व तालुक्यांना नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यांचा निर्णय घेतला. सद्य:स्थितीत राज्यातील ३५८ तालुक्यात ४११ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत.

## नागरिकांच्या सनदेंतर्गत नागरिकांना पुरविल्या जाणा-या सेवा

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **लोकसेवा केंद्र योजना -** अशिक्षित, कमी शिक्षित, अर्धवट शाळा सोडलेले, शिक्षित पण बेराजगार, कारखाने बंद झाले म्हणून बेरोजगार झालेले उमेदवार अशा लाभार्थ्यांसाठी प्रशिक्षण व काम यासाठी योजना तयार करण्यांत आली. शासनाने औद्योगिक प्रशिक्षणासाठी मोठया प्रमाणात पायाभुत सुविधा निर्माण केलेल्या आहेत त्याचा वापर नियमित कामानंतर, सुट्टीच्या दिवशी करुन याचा फायदा उपरोक्त घटकासाठी करण्यांचा तसेच सामाईक सुविधा निर्माण करुन प्रशिक्षित उमेदवारांना यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देणे व त्यांचे सेवागट स्थापन करुन त्यांना कामाच्या जगात प्रवेश करण्यास सहकार्य करणे या उद्देशातून प्रत्येक शासकीय औ.प्र. संस्थांमध्ये लोक सेवा केंद्र स्थापन सन २००५ पासून प्रत्येक शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये सुरु करण्यांचा धोरणात्मक निर्णय घेण्यांत आला. | श्री. पी. एस. जयस्वाल, उपसंचालक<br>श्री. एस. एस. पाटील, सहा. प्रशि. सल्लागार<br>श्री. अ. गु. पवार, निरिक्षक<br>श्री. एस. बी. गायकवाड , अधिक्षक<br>श्रीम. एस.एन.राथ, प्रमुख्र लिपीक<br>तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |
| २ | **मागेल त्याला प्रशिक्षण योजना -** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना शासकीय औ.प्र. संस्थांमध्ये अल्प मुदतीचे प्रशिक्षण देऊ न प्रशिक्षित करणे व स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी मार्गदर्शन करणे व त्यातील काही व्यवसायांसाठी टुलकिट्स देण्यांची योजना शासनाने वंचित घटकासाठी सुरु केली. त्याकरिता सन २००३ साली राज्यातील सर्व शासकीय औ.प्र. संस्थांमधून मागेल त्याचा प्रशिक्षण ही योजना राबविण्यांचा धोरणात्मक निर्णय घेण्यांत आला. | श्री. पी. एस. जयस्वाल, उपसंचालक<br>श्री. एस. एस. पाटील, सहा. प्रशि. सल्लागार<br>श्री. अ. गु. पवार, निरिक्षक<br>श्री. एस. बी. गायकवाड , अधिक्षक<br>श्रीम. एस.एन.राथ, प्रमुख्र लिपीक<br>तसेच संबंधित औ.प्र.संस्थेचे प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |
| ३ | **मॉड्युलर एम्प्लॉएबल स्किल्स-** देशामध्ये व्यवसायिक कौशल्य असलेल्या घटकांचे प्रमाण ५ टक्के आहे. विकसित देशामध्ये तेच प्रमाण ५० टक्के इतके आहे. देशामधील असंघटीत क्षेत्रात काम करणा-या उमेदवार, बेरोजगार, ५ वी उत्तीर्ण उमेदवार या सर्व घटकांना समाजाच्या / कारखान्याच्या गरजेनुसार अल्प मुदतीचे प्रशिक्षण देवून त्यांचे कौशल्य तपासून एन.सी.व्ही.टी. चे प्रमाणपत्र देण्यांत येते. याद्वारे व्यवसायिक | श्री. पी. एस. जयस्वाल, उपसंचालक<br>श्री. एस. एस. पाटील, सहा. प्रशि. सल्लागार<br>श्री. अ. गु. पवार, निरिक्षक<br>श्री. एस. बी. गायकवाड , अधिक्षक<br>श्रीम. एस.एन.राथ, प्रमुख्र लिपीक<br>*तसेच सर्व व्होकेशनल ट्रेनिग प्रोव्हायडरचे | नियमित | श्री. ज. द. भुतांगे संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | प्रशिक्षित उमेदवार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील या योजनेकरिता केंद्र शासन सहाय्य करणार आहे. व उत्तीर्ण उमेदवारास प्रशिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क केंद्र शासनामार्फत परत केले जाणार आहे. याकरिता सन २००८ मध्ये राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये एमईएस ही योजना राबविण्यांचा धोरणात्मक निर्णय घेण्यांत आला. या योजनेंतर्गत विविध अशा ६५ सेक्टर मधील ११५८ अभ्यासक्रम तयार करण्यांत आले असून याची प्रशिक्षणाची सुविधा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध आहे. सद्य:स्थितीत १,२०,००० उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. | संस्थाप्रमुख | | |
| ४ | **विशेष केंद्रीय सहाय्य योजना -** राज्यातील आदिवासींच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत निधी प्राप्त होतो. या योजनेंतर्गत आयुक्त आदिवासी विकास विभाग, यांचे मार्फत निधी वितरीत केला जातो. निधीच्या उपलब्धतेनुसार आदिवासींच्या योजना राबविण्यांत येतात. | श्री. पी. एस. जयस्वाल, उपसंचालक<br>श्री. एस. एस. पाटील, सहा. प्रशि. सल्लागार<br>श्री. अ. गु. पवार, निरिक्षक<br>श्री. एस. बी. गायकवाड , अधिक्षक<br>श्रीम. एस.एन.राथ, प्रमुख लिपीक<br>*तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |
| ५ | **सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना -** या योजनेंतर्गत दारिद्र रेषेखालील कुटुंबातील व्यक्तिंना प्रशिक्षण देणे आणि त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे यासाठी. Skill Training For Emloyment Promotion Amongst the Urban Popor ( STEP-UP) या घटकाची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करता यावी म्हणुन केंद्र शासनाने सुस्पष्ट मागदर्शक तत्वे **( Operational Guidelines )** निर्गमित केलेल आहेत. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत दारिद्र रेषेखालील व्यक्तींना त्यांच्या रोजगारासाठी द्यावयाचे प्रशिक्षण हे राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण **( National Skill Development Policy )** च्या धर्तीवर देण्यांत येते. सदर योजनेस शासन निर्णय दिनांक २५.०१.२०१० अन्वये मुंजुरी देण्यांत आलेली आहे.<br>या येजनेंतर्गत आयुक्त, नगर परिषद संचालनालय यांचे मार्फत निधी वितरीत केला जात असून तो निधी जिल्हास्तरावर जि.व्य.शि.व. प्र. अधिकारी यांना वितरीत करण्यांत येतो व त्यांचे मार्फत जिल्हयातील संस्थांमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यांत येतात. सदरची योजना ही व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, आयुक्त नगर परिषद संचालनालय, मुख्याधिकारी, नगर परिषद, प्रशिक्षण संथांचे संस्थाप्रमुख व जिल्हयातील नोडल संस्था यांच्या समन्वयाने राबण्यिांत येते. | श्री. पी. एस. जयस्वाल, उपसंचालक<br>श्री. एस. एस. पाटील, सहा. प्रशि. सल्लागार<br>श्री. अ. गु. पवार, निरिक्षक<br>श्री. एस. बी. गायकवाड , अधिक्षक<br>श्रीम. एस.एन.राथ, प्रमुख लिपीक<br>*तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६ | **अल्पसंख्याक विकास योजना -** राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील बेरोजगार व होतकरु युवक / युवतींना व्यवसायभिमुख शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देवून त्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम कार्यान्वित केला आहे. त्यानुसार राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील बेरोजगार युवक / युवतींसाठी राज्यातील औ.प्रसंस्थांमध्ये राबविण्यांत येतात.<br>या योजनेंतर्गत अवश्यक निधी अल्पसख्यांक विकास विभागामार्फत उपलब्ध करुन दिला जातो. | श्री. पी. एस. जयस्वाल, उपसंचालक<br>श्री. एस. एस. पाटील, सहा. प्रशि. सल्लागार<br>श्री. अ. गु. पवार, निरिक्षक<br>श्री. एस. बी. गायकवाड , अधिक्षक<br>श्रीम. एस.एन.राथ, प्रमुख लिपीक | नियमित | श्री. ज. द. भुतांगे<br>संचालक (प्रशिक्षण)<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |
| ७ | **आर्टिझन टु टेक्नोक्रॅट -** विविध उद्योगधंदे, कारखाने, इन्फॉर्मल सेक्टरमध्ये तसेच व्यक्तिगतरित्या काम करणारे कारागिर, इयत्ता १ली ते १० वी पर्यंत गळती झालेले विद्यार्थी , इयत्ता १० वी / १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थी, पौढ महिला, विधवा, महिला, बंद पडलेले कारखान्यांचे कामगार / मिल कामगार/ स्वेच्छानिवृत्ती दिलेले कामगार तसेच पारंपारिक व्यवसाय करणारे कामगार इत्यादी गरजु पुरुष / महिला उमेदवारांना त्यांच्या गरजेनुसार व्यवसाय प्रशिक्षण देवून तसेच त्यांच्या कौशल्याच्या स्तरावर प्रमाणपत्र देवून मुख्य प्रवाहात सामिल करणे तसेच कारागिरांची सर्वसाधारण कौशल्य तपासणी करुन त्यांच्या नैपुण्यतेचा दर्जा ठरविणे व त्यांना प्रमाणपत्र देणे जेणेकरुन त्यांना देशात अगर परदेशात त्यांच्या कारागिरांच्या दर्जानुसार काम उपलब्ध व्हावे तसेच शिक्षणापासून वंचित राहणा-या विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट व्यवसायिक प्रशिक्षण देण्यासाठी तसेच अनौपचारीक क्षेत्रातील कुशल कारागीर तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधुन उत्तीर्ण उमेदवारांना सध्याच्या तंत्र / व्यवसाय शिक्षण पध्दतीमध्ये संबंधित व्यवसायामध्ये पदविका / पदवी पर्यंतचे शिक्षण घेण्यांची संधी उपलब्ध करुन देण्यांच्या उद्दीष्ट पूर्तीसाठी आर्टिझन टु टेक्नोक्रॅट ही योजना सुरु करण्यांत आलेली आहे. यामध्ये अल्पकुशल कारागिर ते अतिकुशल कारागिर ( कौशल्य स्तर ०१ ते ४ ) व तंत्रज्ञ ते विशेष तज्ञ ( पाचवा आणि सहावा ) असे सहा स्तर आहेत. | श्री. पी. एस. जयस्वाल, उपसंचालक<br>श्री. एस. एस. पाटील, सहा. प्रशि. सल्लागार<br>श्री. अ. गु. पवार, निरिक्षक<br>श्री. एस. बी. गायकवाड , अधिक्षक<br>श्रीम. एस.एन.राथ, प्रमुख लिपीक<br>*तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे<br>संचालक (प्रशिक्षण)<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |
| ८ | **शिकाऊ उमेदवारी योजनेच्या व्याप्तीत वाढ -** औद्योगिक आस्थापनातील प्रशिक्षण (ऑन द जॉब ट्रेनिंग) हे शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत थेट प्रशिक्षणासाठी औद्योगिक आस्थापनात पाठविण्यांत येते व तेथे त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यांत येते. दुस-या प्रकारात औ.प्र.संस्थेमधील उत्तीर्ण विद्यार्थी प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्यासाठी शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण घेतात. दोन्ही प्रकाराची एन.सी.व्ही.टी. मार्फत परिक्षा घेऊन एकाच प्रकारचे प्रमाणपत्र दिले जाते. प्रशिक्षणा दरम्यान उमेदवारांना दर महा प्रथम वर्षी रु.१४००/-, द्वितीय वर्षी रु.१७००/-, तृतीय वर्षी रु.१९७०/- व चौथ्या वर्षी रुपये २२२०/- विद्यावेतन औद्योगिक | श्री. प्र. न. जयस्वाल, निरिक्षक<br>श्री. एस. एस. पाटील, सहा. संचालक<br>श्रीमती एस.व्ही. देसाई, प्रमुख लिपीक<br>श्री. सु.शा. जाधव, वरिष्ठ लिपीक<br>श्री. वि.वा. तुपे, कनिष्ठ लिपीक<br>*तसेच संबंधित मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रातील अंशकालीन प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे<br>संचालक (प्रशिक्षण)<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | आस्थापनांकडून उमेदवारांना देण्यांत येते. शिकाऊ उमेदवारीच्या जागा ५०००० वरुन ७५००० पर्यंत वाढविण्यांचा निर्णय घेण्यांत आला. आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणा दरम्यान उदरनिर्वाह चालविण्यासाठी दर महा १०००/- निर्वाह भत्ता देण्यांचा निर्णय घेण्यांत आला. सद्य:स्थितीत ५०००० विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतात विद्यार्थी प्रशिक्षित झाल्यानंतर त्याची रोजगारक्षमता वाढते. | | | |
| ९ | **कुशल कारागिरांसाठी परदेशात नोकरीच्या संधी वाढविणे-** जगात २०२० पर्यंत ४६ मिलीयन मनुष्यबळांची आवश्यकता भासणार आहे व सगळ्यात तरुण देश म्हणून देशात मोठ्या प्रमाणात मुनष्यबळ उपलब्ध होणार आहे. देशाची गरज भागवून अधिकचा मुनष्यबळ परदेशात उपलब्ध करुन देणे व त्याजोगे त्याची प्रगती होणे व कारागिराला समाजात मानाचे स्थान मिळणे यासाठी जागतिक पातळीवर प्रमाणपत्र देण्यासाठी इतर देशांशी करार करणे ही गरज निर्माण झालेली आहे. त्याकरिता शासनाने व्हेटासेस (ऑस्ट्रेलिया) या ऑस्ट्रेलियन एजन्सी सोबत फेब्रुवारी २००८ मध्ये सामंजस्य करार केला आहे.<br><br>या निर्णयाचा फायदा औ.प्र.संस्थांमधून प्रशिक्षित व जे ऑस्ट्रेलिया येथे जाऊ काम करुन इच्छितात असे सर्व विद्यार्थ्यांना होईल. | श्री. ह.रा. सुर्यवंशी, सहा. संचालक(तां)<br>श्री. एस.पी. न्यायनीत, सहा.संचालक (अतां )<br>श्री. उ. ना. तायडे, टिप्पणी सहाय्यक<br>श्री. जा. दि. खरात, टिप्पणी सहाय्यक<br>श्रीमती संजना देवरुखकर, लघुलेखीका( उ.श्रेणी )<br>श्रीमती एम.बी. जोशी, लघुलेखीका (नि.श्रे)<br>तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे<br>संचालक (प्रशिक्षण)<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |
| १० | **एव्हीऐशन ट्रेनिंग इन्स्टिट्यूट स्थापन करणे -** भारतीत हवाई वहातुकी संबंधी मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. सद्य:स्थितीत खाजगी संस्था हवाई वाहतुकी संबंधिची तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळ आपल्या स्तरावर तयार करुन घेत आहे तथाप हवाई वाहतुकी संबंधी मनुष्यबळ तयार करण्यासाठी व अशा प्रकारचे प्रशिक्षण घेऊ इच्छिणा-या उमेदवारांना प्रशिक्षण घेणे आर्थिक दृष्ट्या शक्य होत नसल्याने शासनामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये हवाई वाहतुकीसंबंधी प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करुन देण्याची गरज निर्माण झाली होती. याकरिता सन २००७ मध्ये शासकीय औ.प्र.संस्था, ठाणे व दादर (मुलींची) येथे एव्हीऐशन ट्रेनिंग इन्स्टिटयूट स्थापन करण्यांचा शासन निर्णय घेण्यांत आला. या संस्थेमधुन एअर हॉस्टेस, कस्टमर सर्व्हीस एजंट, डॅडीमॅन, एअर क्राफ्ट मेंटेनन्स टेक्निशियन, रॅम्प ऑपरेटर, या हवाई वाहतुकी संबंधी व्यवसायाचे प्रशिक्षण घेवू इच्छिणा-या उमेदवरांना लाभ होईल. सद्य: स्थितीत ५०० उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. | श्री. प्र. न. जयस्वाल, निरिक्षक<br>श्री. एस.एस. पाटील, सहा.प्रशि.सल्लागार<br>श्रीमती एस.व्ही. देसाई, प्रमुख लिपीक<br>श्री. सु.शा. जाधव, वरिष्ठ लिपीक<br>श्री. वि.वा. तुपे, कनिष्ठ लिपीक<br>तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे<br>संचालक (प्रशिक्षण)<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ११ | **उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना -** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना दिल्या जाणा-या कौशल्यात वाढ व्हावी त्याचप्रमाणे गरीब विद्यार्थ्यांना कमवा व शिका यासाठी उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना राज्यात प्रथमच सुरु केली आहे याचा लाभ संस्थेला व विद्यर्थयांना प्रशिक्षणाच्या दरम्यान होतो. त्याकरिता सन २००२ पासून राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ही योजना राबविण्यांचा निर्णय घेण्यांत आलेला आहे. या निर्णयाचा फायदा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये विविध प्रकारची बाहेरील कामे स्विकारुन संस्थेतील साधन सामुग्रीचा महत्तम वापर करुन महसुल शासनास जमा करण्यांत येतो. | श्री. ह.रा. सुर्यवंशी, सहा. संचालक(तां)<br>श्री. एस.पी. न्यायनीत, सहा.संचालक (अतां )<br>श्री. उ. ना. तायडे, टिप्पणी सहाय्यक<br>श्री. जा. दि. खरात, टिप्पणी सहाय्यक<br>श्रीमती संजना देवरुखकर,<br>लघुलेखीका( उ.श्रेणी )<br>श्रीमती एम.बी. जोशी, लघुलेखीका (नि.श्रे)<br>तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे<br>संचालक (प्रशिक्षण)<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,<br>महा. राज्य, मुंबई-१. |
| १२ | **आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणांचे सार्वत्रिकरण करणे -** २८ शासकीय आश्रमशाळांचे रुपांतर व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरमध्ये रुपांतर करण्याची योजना देशात प्रथमच राबविण्यांत आली याद्वारे ८वी व १० दरम्यान तांत्रिक शिक्षण व तद्नंतर आयटीआयच्या प्रशिक्षणाची सोय आश्रमशाळेतच करण्यांत आली आहे. याकरिता सन २००४ मध्ये आदिवासी उमेदवारांसाठी व्यवसाय शिक्षणाच्या व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी रोजगाराभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे या अंतर्गत १२ योजना राबविण्यांबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यांत आला आहे.<br>या योजनांमध्ये आदिवासी महिलांकरिता आदिवासी औ.प्र.संस्थांमध्ये विविध व्यवसायांमध्ये प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करण्यांत आलेल्या आहेत- या योजनेमुळे दरवर्षी ७००० आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतन दर महा रु.६०/- देण्यांत येत होता आता या योजनेंतर्गत वसतिगृहात राहणा-या व वसतिगृहाबाहेर राहणा-या आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांना अनुकमे रु.६००/, रु.५००/- प्रति माह निर्वाह भत्ता देण्यांत येतो. | श्री. ह.रा. सुर्यवंशी, सहा. संचालक(तां)<br>श्री. एस.पी. न्यायनीत, सहा.संचालक (अतां )<br>श्री. उ. ना. तायडे, टिप्पणी सहाय्यक<br>श्री. जा. दि. खरात, टिप्पणी सहाय्यक<br>श्रीमती संजना देवरुखकर,<br>लघुलेखीका( उ.श्रेणी )<br>श्रीमती एम.बी. जोशी, लघुलेखीका (नि.श्रे)<br>तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे<br>संचालक (प्रशिक्षण)<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,<br>महा. राज्य, मुंबई-१. |
| १३ | **अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना**<br>सन २००७ - ०८ या शैक्षणिक वर्षापासून अल्पसंख्यांक ( मुस्लीम, पारसी, शीख, ख्रिश्चन, आणि बौध्द ) समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी मा. पंतप्रधान भारत सरकार यांच्या १५ कलमी कार्यक्रमांतर्गत पोस्ट मॅट्रीक श्यिवृत्ती योजना गेल्या तीन वर्षापासून लागू केलेली आहे. यामुळे अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यंना उच्च शिक्षणाची संधी मिळून त्यांच्यातील रोजगार क्षमता वाढणार आहे. सदरहु योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या कलावधीत ( २००७ - १२ ) अंमलात आणावयाची आहे. तसेच चालु शैक्षणिक वर्ष २०१० - ११ या वर्षातही या योजनेची अंमलबजावणी प्रभावी पध्दतीने होणेसाठी राज्यातील सर्व प्रमुख वृत्तपत्रामध्ये उच्च शिक्षण संचालनालयाकडून जाहिरात देण्यांत येते. | श्री. ह.रा. सुर्यवंशी, सहा. संचालक(तां)<br>श्री. एस.पी. न्यायनीत, सहा.संचालक (अतां )<br>श्री. उ. ना. तायडे, टिप्पणी सहाय्यक<br>श्री. जा. दि. खरात, टिप्पणी सहाय्यक<br>श्रीमती संजना देवरुखकर,<br>लघुलेखीका( उ.श्रेणी )<br>श्रीमती एम.बी. जोशी, लघुलेखीका (नि.श्रे)<br>तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य | | श्री. ज. द. भुतांगे<br>संचालक (प्रशिक्षण)<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई-१. |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १४ | **महानगरपालिका क्षेत्रातील औद्योगक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी व उर्वरित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरु करणे.**<br><br>राज्याच्या औद्योगिकीकरणात झपाटयाने वाढ होत आहे. त्या अनुषंगाने आधुनिक तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाची गरज लघु, मध्यम आणि मेठया उद्योजकांना निर्माण झाली आहेत. व्यवसाय प्रशिक्षणाद्धारे निर्माण केले जाणारे कुशल मनुष्यबळ सद्य:स्थितीत कमी पडत आहे. त्यामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ होणे आवश्यक आहे. राज्यातील विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संथांच्या उपलब्ध यंत्रसामुग्रीचा महत्तम वपर करुन प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय अभ्यासक्रमाच्या सुधि उपलब्ध करुन देण्यांसाठी राज्यातील महापालिका क्षेत्रातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी तसेच उर्वरित ठिकणच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी ऑगस्ट २०१० पासून सुरु झाली आहे. | श्री. ह.रा. सुर्यवंशी, सहा. संचालक(तां)<br>श्री. एस.पी. न्यायनीत, सहा.संचालक (अतां )<br>श्री. उ. ना. तायडे, टिप्पणी सहाय्यक<br>श्री. जा. दि. खरात, टिप्पणी सहाय्यक<br>श्रीमती संजना देवरुखकर, लघुलेखीका( उ.श्रेणी )<br>श्रीमती एम.बी. जोशी, लघुलेखीका (नि.श्रे)<br>तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य | | श्री. ज. द. भुतांगे संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१. |
| १५ | **पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिपद्धारे देशातील १३९६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे दर्जावाढ करणे**<br><br>राज्यात एकूण ४०७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा वाढ करुन दिले जाणारे प्रशिक्षण कारखान्यातील नवीन तंत्रज्ञानाच्या गरजेशी सुसंगत होण्यासाठी व जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ तयार करण्यांसाठी राज्यातील २६६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ केंद्र शासन पुरस्कृत Public Private Partnership योजनेंतर्गत करण्यांत येणार आहे.<br><br>या योजनेत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांकरिता एका Industry Partner ची सहयोगी उद्योग म्हणुन निवड करण्यांत येवुन संबंधित Industry Partner (IMC अध्यक्ष) राज्य शासन व केंद्रशासन यांच्या त्रिपक्षीय सामंजस्य करार केला जातो. या Industry Partner च्या अध्यक्षतेखाली संस्था व्यवस्थापन समिती (IMC) स्थापन करावयाची असून समितीत परिसरातील अन्य चार Industry Partner सभासद असतात. तसेच शासनाचे सहा पतिनिधी असुन प्राचार्य हे सदस्य सचिव असणार आहेत. संस्था व्यवस्थापन समिती IMC ला सोसायटी नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणी करुन शैक्षणिक व आर्थिक स्वायत्ता देण्यांत आलेली आहे. सदर समितीच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यांत आलेल्या खात्यामध्ये प्रत्येकी रु २.५० कोटी रक्कम व्याजमुक्त कर्ज रुपाने केंद्रशासनाकडून जमा केले जातात. या कर्जाच्या रकमेतुन संस्थ्ेचा गुणात्मक विकास करावयाचा असून विविध उपक्रम राबवुन महसुल वाढवावयाचा आहे. या व्याजमुक्त कर्जाची परतफेड ११ व्या वर्षापासुन ३० वर्षापर्यंत समान २० हप्त्यात समितीने रावयाची आहे. | श्री. व्ही. के. टेके, निरिक्षक<br>श्री. नितीन के. चौधरी, अधिक्षक(तां)<br>श्रीमती अ.गि. कानविंदे, प्रमुख्र लिपीक<br>कु. द. व. जाधव, कनिष्ठ लिपीक<br><br>तसेच संबंधित औद्योगिक पशिक्षण संस्थेतील प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | सन २००७ - ०८ पासुन या योजनेची अंमलबजावणी देशात तसेच राज्यात सुरु झालेली आहे. या याजनेंतर्गत सन २००७ - ०८ या वर्षात राज्यातील ६२, २००८ - ०९ मध्ये ५५ व २००९-१० मध्ये ६० संस्थांचा यात समावेश करण्यांत आलेला असून प्रत्येकी रु २.५० कोटी व्याजमुक्त कर्ज रुपाने समितीच्या बँक खात्यात जमा झालेले आहेत.<br>सन २०१० - ११ मध्ये ६० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा समावेश करण्यांचे प्रस्तावित असून राज्यातील उर्वरित संस्थांचा केंद्र शासनाच्या निर्देशानुसार पुढील वर्षी समावेश करण्यांत येणार आहे. | | | |
| १६ | **सेंटर ऑफ एक्सलन्स योजना -** राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधुन दिले जाणारे प्रशिक्षण कारखान्यातील नविन तंत्रज्ञानाच्या गरजेशी सुसंगत होण्यासाठी व जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यांसाठी कारखाने / औद्योगिक संघटना यांच्या सहभागाने केंद्र शासनाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा उंचावून त्यांना सेंटर ऑफ एक्सलन्स मध्ये रुपांतरीत करण्यांची योजना सन २००५ पासुन सुरु करण्यांत आली आहे. उद्योगधंद्यामध्ये नविन तंत्रज्ञानामुळे बहुकौशल्य कारागीरांची ( Multi Skill Workers ) असल्याने बहुकौशल्यमुक्त मनुष्यबळ तयार करण्यांसाठी ही योजना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राबविण्यांत येत आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करुन त्यांना सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रुपांतरीत करणे ही योजना सन २००५ - ०६ पासून पहिल्या टप्प्यात राज्यातील १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये डोमेस्टीक फंडीगद्धारे सुरु करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणे जागतिक बँक सहाय्यित व्यवसाय प्रशिक्षण सुधारणा प्रकल्पात राज्यातील ७५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेंची स्थापना करण्यांत आली असून उर्वरित १२ संस्थांमधील फक्त व्यवसायांचा दर्जावाढ करण्यांत आलेला आहे. सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेंतर्गत १४ सेक्टरचा समावेश करण्यांत आलेला असून सदर अभ्यासक्रम दोन वर्ष कालावधीचा आहे. पहिल्या वर्षी बॉड बेस बेसिक मॉडयुलचे प्रशिक्षण ०६ बेसिक मॉडयुलद्धारे देण्यांत येते. हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील सहा महिन्यांमध्ये ॲडव्हान्स मॉडयुलचे प्रशिक्षण देण्यांत येते. ॲडव्हान्स मॉडयुलचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर सहा महिने स्पेशलाईज मॅाडयुलचे प्रशिक्षण आस्थापनेमार्फत देण्यांत येते. | श्री. आर. बी. भावसार, प्रकल्प समन्वयक<br>श्रीमती व्ही.व्ही. पंडीत, अधिक्षक<br>श्री. डी. एस. दामोदर, अधिक्षक (तां )<br>श्रीमती. सु. स. गमरे, मुख्य लिपीक<br>श्री. एस.एन.परब, वष्ठि लिपीक<br>श्री. एन.के. राणे, कनिष्ठ लिपीक<br>तसेच संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य | नियमित | श्री. ज. द. भुतांगे<br>संचालक (प्रशिक्षण)<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महा. राज्य, मुंबई-१. |

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १७ | **खाजगी कायम विना अनुदान तत्वावर नविन औ.प्र.केंद्र सुरु करणे / विद्यमान औ.प्र.केंद्रात नविन व्यवसाय / जादा तुकडी सुरु करणेबाबत** इच्छुक व्यवस्थापनाकडून अर्ज मागविणे<br><br>संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयामध्ये माहिती पुस्तिका व अर्ज रु ५००/- किंमतीत उपलब्ध<br><br>परिपूर्ण भरलेला अर्ज संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाकडे सादर करणे<br><br>शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर डी.जी.ई.टी, नवी दिल्ली यांचेकडून संलग्नता प्राप्त करुन घेणे. | श्री. एम. के. पाटील, सहा. प्रशि. सल्लागार (तां )<br><br>श्रीमती सु.प्र पाटील, मुख्य लिपीक<br><br>श्री. सुनिल गोरीवले, वरिष्ठ लिपीक<br><br>श्रीमत दि. म. धानोरकर, कनिष्ठ लिपीक | प्रत्येक वर्षी सप्टेंबर / ऑक्टोंबर ऑक्टोबर / नोव्हेंबर<br><br>नियमीत दरमहा | श्री. ज. द. भुतांगे संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१. |

नागरी सुविधेबाबतची माहिती internet वर www.dvet.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या आहेत.